FORM-1A 0068608 N.C.R.B. I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station डा. प्र. वि. पहिली खबर क्र. FIR No. 21 वर्ष Year 2023 दिनांक Date 26.04.2023
2. (i) अधिनियम Act म. प्र. अधिनियम १९८८ कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ..... कलमे Sections .....
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .....
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day मंगळवार तारीख पासून Date from 25.04.23 वेळ Time 11:00 तारीख पर्यंत Date to 25.04.23 वेळ Time 16:30
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 25.04.2023 वेळ Time 11:00
   (c) गुन्हा दाखल झालेला सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/2023 तारीख Date 26.04.2023 वेळ Time 04/45
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..... चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. .....
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ..... Chouki / Beat / O.P. Name and No. .....
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name दालन क्र. 11, घन कचरा व्यवस्थापन विभाग, 'टी' वॉर्ड, बृ. म. न. पा कार्यालय, मुलुंड (प), मु. ठिकाणाचे नंबर No. If any ..... रस्त्याचे नाव Name of road .....
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..... गाव Village ..... पोस्ट Post ..... तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State .....
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव : In case, outside the limit of this Police Station ..... तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State .....
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name विनोद (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name सखाराम रोकडे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 40 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9869836669
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..... दिल्याचा दिनांक Date of Issue ..... दिल्याचे ठिकाण Place of Issue ..... (f) व्यवसाय Occupation .....
   (g) धर्म Religion बौद्ध जात Caste ..... जनजात Sub-Caste .....
   (h) पत्ता Address : 60, कल्पतरू सोसायटी, डी. डी. क्रॉस रोड, बुद्ध विहारच्या मागे, मुलुंड (प) Ward मुंबई - 80 House/Name No. ..... Phone/M. No. ..... PAN No. ..... Card No. .....
   रस्त्याचे नाव Road ..... जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..... गाव Village ..... पोस्ट Post ..... पो. स्टे. P. Stn. .....
   तालुका Taluka ..... जिल्हा Dist. ..... राज्य State ..... सध्याचा पत्ता Present Address .....
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   श्री. निवृत्ती त्र्यंबकराव तेलगोटे वय 47 वर्षे, धंदा - दुय्यम अभियंता घन कचरा व्यवस्थापन विभाग, बृ.म.न.पा 'टी' वॉर्ड, मुलुंड (प) मुंबई - 80, राहणार - सह जीवन सोसायटी, 619 भरवाडी बर्वे नगर, घाटकोपर (प), मुंबई - 84

Y.P.P.-3,200 BK.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned with OKEN Scanner

फिर्यादि श्री. विनोद सखाराम शेकडे वय ४० वर्षे, धंदा – व्यवसाय, राही – कल्पतरु सोसायटी, डी.डी.यू रोड, बुद्द विहारच्या मागे, मुलुंड (प), मुंबई - ८० यांची सविस्तर फिर्यादि स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आली असून, तीच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

(गणेश सूर्यवंशी)
पोलीस निरीक्षक
गु. प्र. वि, मुंबई

फिर्याद                दिनांक — २६/०७/२०२३.

मी श्री विनोद सखाराम रोकडे, वय ४० वर्षे, धंदा: व्यवसाय रा.ठि. ९०, कल्पतरु सोसायटी, डी.डी.यु रोड, बुध्द विहाराच्यामागे, मुलूंड पश्चिम, मुंबई ८० मो. नं. ८१६९८३६६६१.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासमवेत जन्मापासून रहात आहे. मी संजिवनी सामाजिक संस्था सन २०११ मध्ये स्थापन केली असून त्याचा नोंदणी क. महाराष्ट्र राज्य २५१७/२०११ जी.बी.बी. एस. डी. असा आहे. नमूद संस्थेमार्फत मी मुंबई महानगरपालिका मुलूंड पश्चिम विभागातील साफसफाईचे कामाचे टेंडर घेवून काम करतो. तसेच मी रिक्षा चालवून माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

माझी पत्नी सौ. रुपाली विनोद रोकडे व आमचे राहते परिसरातील इतर महिला यांनी देखील संजिवनी महिला बचत गटाची दि.२२/०२/२०१९ रोजी स्थापना केली आहे. त्याचा नोंदणी क. **FBP/II/3884,** दि.१५/०१/२०२० असा आहे. सदर बचत गट हा माझी पत्नी चालवित असून सदर बचत गटाचे शासकिय कार्यालयातील पत्रव्यवहाराचे व इतर कामे मी करीत असतो.

संजिवनी सामाजिक संस्था व संजिवनी महिला बचत गटामार्फत बृहन्मुंबई महानगर पालिका कार्यालय, 'टि' विभाग, मुलूंड पश्चिम मध्ये ''स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' या योजनेअंतर्गत गलीच्छ वस्ती स्वच्छता योजनेचे टेंडर घेत असतो. सदरचे टेंडर हे सहा महिन्याकरीता निघत असतात. टेंडर मिळाल्यानंतर झोपडपटटीमधील कचरा गोळा करणे, टॉयलेट स्वच्छ करणे, पायवाटा स्वच्छ राखणे इत्यादी कामे केली जातात. सदर कामे केल्यानंतर बचतगट, सामाजिक संस्था यांना महानगर पलिकेकडून भरलेल्या टेंडरप्रमाणे मानधन रक्कम त्यांच्या बचत खात्यात जमा होते. सदर मानधन रक्कम मिळाल्यानंतर ती संबंधित स्वयंसेवक यांना अदा केली जाते.

बृहन्मुंबई महानगर पालिका 'टि' वार्ड कार्यालय मुलूंड पश्चिम मुंबई यांनी 'टि' वार्ड विभागाने 'स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान' योजनेअंतर्गत १ जून २०२३ पासून पुढिल सहा महिन्याकरीता दि.२९/०५/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजता टेंडर काढले होते. सदर टेंडर प्रक्रियेमध्ये साधारण ३४ संस्थांनी सहभाग घेतला होता. सहभागी झालेल्या संस्थापैकी १३ संस्थांना टेंडर मिळाले होते. त्यामध्ये माझी पत्नी सौ रुपाली रोकडे चालवित असलेल्या संजिवनी महिला बचत गटाला देखिल मुलूंड 'टि' वार्ड विभागातील घाटीपाडा, मलबार हिल, उदयनगर, वाळकाबाई चाळ, गणेश पाडा या भागातील स्वच्छता करणेबाबत टेंडर मिळाले होते. सदर टेंडरची कागदपत्रे मी या तक्रारीसोबत सादर करीत आहे.

सदर टेंडर मिळाल्यानंतर संजिवनी महिला बचत गटाने दि. १ जून २०२३ पासून संबंधित विभागात स्वच्छतेचे काम चालू केले. परंतू बृहन्मुंबई महानगर पालिका 'टि' वार्ड कार्यालय मुलूंड पश्चिम मुंबई यांचेकडून वर्क ऑर्डर मिळाल्याशिवाय केलेल्या कामाचे बील सादर करता येत नाही. त्यामुळे मी बृहन्मुंबई महानगर पालिका 'टि' वार्ड विभागातील संबंधित लोकसेवक श्री निर्वाण त्र्यंबकराव तेलगोटे, दुय्यम अभियंता, घनकचरा व्यवस्थापन, यांना दि.०५/०७/२०२३ रोजी माझे परिसरातील राहणार इसम नामे श्री प्रशांत माळवे याचेसोबत गेलो असता लोकसेवक यांनी माझेकडे सदर वर्क ऑर्डर देण्याकरीता रु.६,०००/—लाचेची मागणी केली. त्यानंतर

Scanned with OKEN Scanner

देखिल मी त्यांना दोन ते तीन वेळा समक्ष भेटून वर्क ऑर्डर देण्याची विनंती केली असता त्यांनी पैसे दिल्याशिवाय वर्कऑर्डर देणार नाही असे सांगितले.

परंतु मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.२५/०७/२०२३ रोजी ११.०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे येवून श्री निर्वाण त्र्यंबकराव तेलगोटे, दुय्यम अभियंता 'टि' वार्ड मुलूंड पश्चिम मुंबई यांचेविरुध्द लेखी तक्रार दिली. त्याप्रमाणे श्री निर्वाण त्र्यंबकराव तेलगोटे, यांचेविरुध्द पडताळणी कारवाई करीता पोलीस निरीक्षक गणेश सुर्यवंशी यांचे दालनात हजर झालो. त्यांचे समक्ष आणखी एक इसम बसले होते त्यांची ओळख मला उमेश पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त अशी करुन देवून ते पडताळणी/सापळा कारवाईमध्ये पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन कामकाज करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी यांनी पथकात सहभाग घेणाऱ्या पोलीसांना त्यांचे दालनात बोलावुन त्यांची ओळख करुन दिली. तसेच दोन सरकारी पंच यांना बोलावुन त्यांची ओळख अनुक्रमे श्री दत्तात्रय बळीराम खरात व श्री विशाल जयराम नांगरे यांची ओळख करून दिली. सदर कारवाईदरम्यान ते पंचांचे काम करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर दोन्ही पंचाना पो.नि.सुर्यवंशी यांनी माझे स्वहस्ताक्षरातील लिहीलेला माझा तकार अर्ज दाखविला व सदरचा अर्ज पो.नि. सुर्यवंशी यांनी पुढील कारवाईकरिता स्वत:कडे ठेवुन घेतला. त्यानंतर पोनि सुर्यवंशी यांनी मला व पंचांना गोपनीय कक्षात घेवुन गेले व तेथे माझे, पो.नि. सुर्यवंशी व दोन पंच यांचे व्यक्तव्य एका डीव्हीआर मध्ये ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी, सपोआ उमेश पाटील, दोन सरकारी पंच तसेच सापळा कारवाईत सहभाग घेणारे पोलीस अंमलदार असे पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाचे आवारात उभ्या असलेल्या दोन सरकारी वाहनाजवळ आले व एका वाहनात मी स्वत: पो.नि. सुर्यवंशी, सपोआ उमेश पाटील, सरकारी पंच खरात, मपोशि गावंड, पो. शि. मठपती, व दुसऱ्या वाहनात इतर पोलीस पथकातील अंमलदार व पंच नांगरे असे बसुन बांद्रा वरळी सी लिंक, बीकेसी, पुर्व द्रुतगती महामार्ग मार्गे, मुलूंड गोरेगाव लिंक रोडने, एल.बी.एस. मार्गे अग्रवाल हॉस्पीटल, मुलूंड पश्चिम येथे पोहोचलो.

त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी यांनी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान माझे शर्टच्या आतील बीनयनला सेप्टी पिनच्या साहायाने डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सागितले. त्यावेळी पो.नि.सुर्यवंशी यांनी पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती समजावुन सांगितली.

मी लोकसेवक यांचे कार्यालयात जाताना मला व पंच श्री खरात यांना सुचना दिल्या व त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतील बाजूस बनीयनला सेप्टी पिनच्या साहायाने लावला. त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी यांचे सुचनेप्रमाणे मी व पंच खरात असे अग्रवाल हॉस्पीटल येथून अॅटो रिक्षाने मुंबई

समक्ष
(गणेश सुर्यवंशी),
पोलीस निरीक्षक
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( विनोद सखाराम रोकडे )

Scanned with OKEN Scanner

महानगरपालिका 'टि' वार्ड कार्यालयाकडे रवाना झालो. 'टि' वार्ड कार्यालयाचे बाहेर रिक्षा थांबवून मी व पंच खरात यांनी वार्डमध्ये प्रवेश केला व वार्डचे तळमजल्यावर असलेले लोकसेवक यांचे दालन क्र.११ मध्ये गेलो. सदरवेळी लोकसेवक निर्वाण तेलगोटे साहेब हे त्यांचे केबीनमध्ये उपस्थित होते. मी लोकसेवक यांचे केबीनमध्ये गेलो त्यावेळी पंच श्री खरात हे केबीनचे दरवाज्यातच उभे होते. मी वर्कऑर्डरबाबत लोकसेवक तेलगोटे साहेब यांचेशी बोलणी केली असता लोकसेवक तेलगोटे साहेब यांनी वर्कऑर्डरच्या कॉपीवर माझी सही घेतली व त्यांनी दोन आणि दोन चार हजार दे...असे बोलून लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना बोललो की, **''चार हजार.! तीन हजार दिले तर चालेल आता?''** असे बोललो असता, **'' नाही... कंटाळलो मी आता''** असे बोलून मला वर्कऑर्डर देण्यास नकार दिला व मला दिलेली वर्क ऑर्डरची कॉपी परत घेतली व पैसे आणल्यावर वर्क ऑर्डर घेवून जा असे सांगितले. लोकसेवक यांना मी पाच मिनीटात एटीएम मधून पैसे घेवून येतो असे सांगुन तेथून निघून पोनि सुर्यवंशी यांच्या सुचनेप्रमाणे मी व पंच खरात तेथुन निघुन सापळा कारवाई पथक वाहन थांबले होते तेथे परत आलो. त्यानंतर माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर पोनि सुर्यवंशी यांनी काढला व पो.नि. सुर्यवंशी यांनी त्यांच्या ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यावेळी माझे व लोकसेवक तेलगोटे साहेब यांचेमध्ये झालेल्या संभाषणाची हकीगत सांगितली. त्यानंतर पो.नि. सुर्यवंशी यांनी पंच श्री खरात यांना माझे व लोकसेवक यांचेमध्ये झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता पंच श्री खरात यांनी सांगितले की, मी दरवाज्याजवळ उभे राहून तक्रारदार व लोकसेवक यांचेतील संभाषण सविस्तररित्या ऐकले असून लोकसेवक यांनी वर्कऑर्डर देण्यासाठी दोन आणि दोन चार हजार दे असे बोलून मागणी केल्याचे स्पष्टपणे ऐकले आहे. त्यानंतर पोनि सुर्यवंशी यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन पंचांना संभाषण ऐकवले असता त्यामध्ये माझे व लोकसेवक तेलगोटे यांचेमध्ये झालेल्या संभाषणात लोकसेवक तेलगोटे यांनी रु. ४०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर पो.नि.सुर्यवंशी यांनी मला, पोलीस पथक व दोन पंचाना सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर मी माझ्या बचतीतून आणलेली लाचेची रक्कम रु.४,०००/— ( भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या एकुण ८ नोटा) पो.नि.सुर्यवंशी यांचेकडे सुपुर्द केल्या. त्या नोटांचे पोनि सुर्यवंशी यांनी नमूद नोटांच्या क्रमांकाचे मोबाईलमध्ये फोटो काढून घेतले. त्यानंतर पो.नि.सुर्यवंशी यांनी मला व दोन पंचांना ॲन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सागितले व त्यांचे सुचनेनुसार पथकातील वाहन चालक श्री. जामसंडेकर यांनी नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावली. व ती रक्कम पो.नि.सुर्यवंशी यांनी अलगद माझे शर्टाचे डाव्या खिशात ठेवली. तसेच श्री जामसंडेकर हे सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.सुर्यवंशी यांनी डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाचे आतील बाजुस बनीयनला सेप्टी पिनच्या सहाय्याने अडकविला. त्यानंतर पो.नि.सुर्यवंशी यांचे सुचनेनुसार मी व पंच खरात असे रिक्षाने

समक्ष

(signature)

( गणेश सुर्यवंशी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature)

( विनोद सखाराम रोकडे )

Scanned with OKEN Scanner

लोकसेवकाचे कार्यालयाकडे निघालो पाठोपाठ पथकातील अधिकारी व अंमलदार असे कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने आमचे पासुन काही अंतर ठेवुन 'टि' वार्ड कार्यालयाचे आजुबाजुला येवून थांबले.

त्यानंतर मी व पंच खरात लोकसेवकाचे 'टि' वार्ड कार्यालयात गेलो. त्यावेळी पथकातील अधिकारी व कर्मचारी हे देखिल कोणास संशय येणार असे दालन क्र. ११ चे बाहेर येवून थांबले. त्यावेळी मी व पंच खरात असे लोकसेवक श्री तेलगोटे यांचे दालन क्र. ११ मधील तेलगोटे यांच्या केबीनमध्ये गेलो. त्यावेळी पंच श्री खरात हे लोकसेवकाचे केबीनच्या दरवाज्याजवळच उभे होते. त्यावेळी लोकसेवक तेलगोटे यांनी मला बोलले की, " कर्य वेळ लागला रे...." मी त्यांना म्हणालो, "पाउस पण होता ना.. पुर्ण आणले मी चार हजार हा का..." त्यावेळी लोकसेवक यांनी "हु ठिक आहे" असे बोलून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्यानंतर मी त्याचेसोबत थोडीशी बातचीत करुन आणलेली लाचेची रक्कम रु. ४०००/- लोकसेवक तेलगोटे यांचे हातात पंच श्री खरात यांचेसमक्ष दिली असता लोकसेवकांनी उजव्या हाताने स्वीकारुन नोटा मोजून त्यांचेकडील पांढऱ्या लिफाफ्यात ठेवली. त्यानंतर त्यांनी सदरचा पांढरा लिफाफा त्यांचे सॅकमध्ये ठेवला. त्यानंतर मी दालन क्र. ११ चे बाहेर येवून ठरल्याप्रमाणे माझे डोक्यावरील टोपी काढून डोक्यावरुन हात फिरवुन सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी अंमलदार लोकसेवकाचे दालनात आले व त्यांनी पंचासमक्ष लोकसेवक तेलगोटे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. लागलीच पोनि सुर्यवंशी यांनी लोकसेवक तेलगोटे यांचे ताब्यातील मिळून आलेल्या नोटा व मोबाईल फोनच्या फोटोमधील नोटांची खात्री केली असता त्या एकाच क्रमांकांच्या असल्याचे दिसून आले.

लोकसेवक निर्वाण तेलगोटे दुयम्म अभियंता, यांनी "स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान" या योजनेअंतर्गत गलीच्छ वस्ती स्वच्छता योजनेचे टेंडरची वर्क ऑर्डर देण्याकरीता प्रथम रु.६०००/- ची मागणी करुन त्यानंतर तडजोडीअंती रु. ४,०००/- ची मागणी करुन रु.४,०००/- लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक निर्वाण तेलगोटे, दुय्यम अभियंता, मुंबई महानगरपालिका 'टि' वार्ड, मुलूंड पश्चिम मुंबई यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक निर्वाण तेलगोटे दुय्यम अभियंता, 'टि' वार्ड, मुलूंड पश्चिम मुंबई यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
(signature)
( गणेश सुर्यवंशी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature) विनोद रोकडे
( विनोद सखाराम रोकडे )

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे — तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य — रोख रक्कम ४,०००/—

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील तारीख वेळी व ठिकाणी लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्या फर्मच्या 'संजीवनी महिला बचत गटास सं.नं.ण 'यो' विभागातील स्वच्छतेच्या कामाच्या टेंडरची वर्क ऑर्डर देण्यासाठी प्रथम ६०००/- रु लाचेची मागणी केली, पडताळणी दरम्यान तडजोडीअंती ४,०००/- रु लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता शासकीय काम करुन देण्याच्या मोबदल्यात वैध पारिश्रमिका व्यतिरिक्त स्विकारुन गुन्हेगारी स्वरुपाचे गैरवर्तन केले म्हणून भ्र.प्र.अधि १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद

3. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमान्वये गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

गणेश सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ______, जिल्हा ______, राज्य ______

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ______ Rank ______ No. ______ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ______ (3) Transferred to P. S. ______

District ______ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही [signature]

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name गणेश सुर्यवंशी

हुद्दा Rank पोलीस निरीक्षक

बक्कल क्र. वा कोड क्र. ला. प्र. वि, मुंबई

Posting

Code No. of I. O. ______

INSPECTOR OF POLICE, ANTI-CORRUPTION BUREAU, MUMBAI (stamp)

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ______

1. Date and time of submitted to the Court ______

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक) 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer) 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner